# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**येरवडा (जि.पुणे) येथील विभागीय क्रीडासंकुलाचे अपूर्ण असलेले काम**

**(१) ४२४६ (२२-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील म.हौ.वोर्ड येरवडा येथील स.न. १९१ अ येथे पुणे विभागीय क्रीडासंकुलाचे काम गत १५ वर्षा पासून सुरु असून अनेक कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रीडासंकुलाचे काम अपूर्ण असल्याची नेमकी काय कारणे आहेत व उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

विभागीय क्रीडासंकुलातील बास्केटबॉल कोर्ट, लॉन टेनिस कोर्ट, जलतरण तलाव, डायव्हिंग पूल व बेबी तलाव, इनडोअर बॅडमिंटन हॉल, खो-खो, कबड्डी मैदान, व्हॉलीबॉल, मैदान इत्यादी क्रीडा सुविधा पूर्ण झाल्या असून वापर सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रंथालयांना अनुदान देण्याबाबत**

**(२) ४७७७ (२२-१२-२०१४). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथालयांना अनुदान देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर ग्रंथालयाचा कारभार सुरळीत चालावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१५) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील क्रीडा संकुलांच्या कामास त्वरीत निधी उपलब्ध करुन प्रलंबित क्रीडा संकुलाची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत**

**(३) ८६२० (०९-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३८१ तालुका क्रीडा संकुलापैकी २७८ तालुक्यांमध्ये भुखंड उपलब्ध असुन त्यापैकी २६ क्रीडा संकुले पुर्ण झालेली आहेत व १६९ संकुलाची कामे प्रगतीपथावर आहेत तर ८३ तालुक्यातील क्रीडा संकुलाची कामे तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे सुरु होऊ शकलेली नाहीत व उर्वरित १०३ तालुक्यांमध्ये क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उल्हासनगर (जि.ठाणे), नाशिक, अंजनगाव, बारी, भातकुली (जि.अमरावती) पाचोरा, चाळीसगांव (जि.जळगांव) लोहारा, वाशी, परांडा (जि.उस्मानाबाद), पारशिवनी (जि. नागपूर) व जालना जिल्हयातील अंबड, घनसांगवी, मंठा, परतुर, भोकरदन तसेच बुलढाणा आदि ठिकाणी क्रीडा संकुलाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हयाची निर्मिती झाल्यानंतर पालघर जिल्हयात विनाविलंब क्रीडा संकुल उभारण्यात यावे म्हणून काही लोकप्रतिनिधींनी यापूर्वी मा. मुख्यमंत्री, क्रीडा विभाग आदींकडे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त क्रीडा संकुलांच्या कामास त्वरीत निधी उपलब्ध करुन सदरील क्रीडा संकुलाची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, उक्त जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुलांचे काम केंव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०१-२०१६) :**(१) नाही. राज्यातील ३८१ तालुका क्रीडा संकुलापैकी २९० तालुक्यांमध्ये जागा उपलब्ध आहे. त्यापैकी ४० क्रीडा संकुले पुर्ण झालेली आहेत, १४८ संकुलाची कामे प्रगतीपथावर आहेत, ६६ तालुक्यातील क्रीडा संकुलाची कामे तांत्रिक/न्यायालयीन वाद व प्रशासकीय कारणांमुळे सुरु होऊ शकली नाहीत. १५ क्रीडा संकुलाचे प्रस्ताव नव्याने मान्यतेसाठी संचालनालयास प्राप्त झाले आहेत. २१ क्रीडा संकुलाचे अंदाजपत्रक आराखडे मान्यतेसाठी अप्राप्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) जिल्हा क्रीडा संकुल समितीकडून जिल्हा क्रीडा संकुल उभारणीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु असून संकुल उभारणीचे अंदाजपत्रक आराखडे प्राप्त झाल्यावर राज्य क्रीडा विकास समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतील. त्याचप्रमाणे पालघर जिल्हयातील ८ तालुक्यापैकी २ तालुका क्रीडा संकुलासाठी जागा प्राप्त आहे व १ तालुका क्रीडा संकुलाच्या अंदाजपत्रक आराखड्यांना मान्यता देण्यात आलेली असून रु.१००.०० लाखाचा निधी वितरीत केलेला आहे व काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित तालुका क्रीडा संकुलांच्या ठिकाणी जागा शोधण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्राथमिक शाळामधील कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन शिक्षकांना पुर्ण मानधन देण्यासह राज्यातील ३३५६ शाळांच्या पुढील ५ महिन्यांच्या अनुदानासंदर्भातील मागण्याबाबत**

**(४) ९९५९ (०९-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर.टी.ई.-२००९ च्या अनुषंगाने निर्माण झालेल्या इतर प्राथमिक शाळामधील कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन शिक्षकांच्या पुर्ण ५००० मानधना संबंधातील व राज्यातील ३३५६ शाळांच्या पुढील ५ महिन्यांच्या अनुदानासंदर्भातील मागण्या गांभीर्याने विचारात घेणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३० डिसेंबर, २०१२ रोजी लेखी निवेदनाव्दारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच अंशकालीन शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार अंशकालीन निदेशकांचे पॅनल तयार करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. प्रवेशाच्या वेळी घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल शून्य टक्के लागल्याबाबत**

**(५) ११०६७ (०८-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. प्रवेशाच्या वेळी घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल शून्य टक्के लागल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठात अन्य कोणत्याही विषयांच्या पी.एच.डी. परीक्षेचा निकाल शून्य टक्के लागला नसताना जाणवीपूर्वक मराठी विषयाचे पेपर तपासणीची कठीण पद्धत अवलंबिल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची परीक्षा बहुपर्यायी उत्तरे स्वरुपाची असतानासुध्दा शून्य टक्के निकाल लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार व प्रसार व्हावा यासाठी कोणते अधिक प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत,

(५) असल्यास, शासनाची याबाबतची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०७-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्नपत्रिका फक्त बहुपर्यायी स्वरुपाची नसून संयुक्तपणे बहुपर्यायी प्रश्न (४० गुण) लघुत्तरी प्रश्न (३०गुण) व दीघोत्तरी प्रश्न (३० गुण) अशी एकूण १०० गुणांची असून ५० गुण (मागासवर्ग ४५ गुण) मिळाल्यास संबंधित उमेदवार पात्र (Eligible) जाहीर करण्यात येतो. द्वितीय सत्र २०१४ पी.एच.डी. प्रवेश परीक्षेस एकूण २५ विद्यार्थी /परिक्षार्थीपैकी २१ विद्यार्थी/परिक्षार्थी उपस्थित होते व उर्वरित ४ अनुपस्थित होते. उपस्थित असलेल्या २१ विद्यार्थी/परिक्षार्थी ७ ते ४० या दरम्यान गुण प्राप्त झाले असल्यामुळे सदर निकाल शुन्य टक्के लागला आहे.

(४) व (५) महाराष्ट्र राज्यांचे पुढील २५ वर्षा साठीचे मराठी भाषा विषयक धोरण २०१४ निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून त्याद्वारे मराठी भाषेचे संवर्धन प्रचार व प्रसार घेण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

---

**शासकीय दर करार सन २०१२ ला संपुष्टात आल्याबाबत**

**(६) १११९० (०९-०४-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संचालक वैद्यकीय शिक्षण विभागातील सर्व शासकीय दर करार सन २०१२ सालीच संपुष्टात आल्यामुळे अधिष्ठातांना शासकीय दर करार संपुष्टात

आल्यामुळे औषधांकरीता व शल्यचिकीत्सेकरीता आवश्यक साधनांकरीता संचालकांची परवानगी घ्यावी लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, हृदयरोग चिकीत्सा शास्त्राकरीता वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व वायर हे अत्यंत कमी दर्जाचे असल्यामुळे नवीन दर करारामध्ये त्याची दर्जोन्नती करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांना खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) औषधी/सर्जिकल बाबींचे विनिर्दिष्टे/मानके ठरवून शासन मान्य अटी व शर्ती व विहीत कार्यपध्दतीनुसार दरकरार करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना दहावी-बारावीनंतर दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्राप्रमाणेच आठवीनंतरचेही प्रमाणपत्र देण्याबाबत

**(७) ११२२६ (०९-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना दहावी-बारावीनंतर दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्राप्रमाणेच आठवीनंतरचेही प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायदा अंमलात येऊन चार वर्षे झाल्यानंतर ही राज्यातील कोणत्याही शाळेद्वारे सदरील नियमाचे पालन केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उक्त शाळांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाचोरा भडगाव व चाळीसगाव (जि.जळगाव) येथील पोषण आहार साहित्याची तपासणी केल्याबाबत

**(८) ११३०९ (०९-०४-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव व चाळीसगाव (जि.जळगाव) येथील शिक्षण विभागातील शालेय पोषण आहार अधिक्षकांच्या पथकाने व पोलिसांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये ठेकेदारांच्या पोषण आहाराच्या

साहित्याची तपासणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहार घोटाळ्यातील संशयितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणारे निवेदन सामाजिक कार्यकर्ते, श्री.सलील देशमुख यांनी जळगांव जिल्हाधिका-यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) श्री. देशमुख यांची तक्रार शालेय पोषण आहार योजनाबाबत नसून एका वाहतुकदाराच्या विरुध्द तक्रार आहे.शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळाची वाहतूक व ग्रामीण भागात धान्यादि मालाचा पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादारांची नियुक्ती केली आहे. यानुसार जळगांव जिल्हयासाठी दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेतील शाळांचे अनुदान वाढविण्याबाबत**

**(९) ११३५२ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानात शाळांना वेतन व पेन्शनसाठी शासनामार्फत १०० टक्के अनुदान देण्यात येते मात्र नगरपालिका व महानगरपालिकेतील शाळांना केवळ ५० ते ८० टक्के अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तफावत दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दि. १६/१२/१९८७ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका व नगरपालिकांना प्राथमिक शिक्षणावरील खर्चासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानाचे सुत्र निश्चित करण्यात आले आहे.

RTE Act नुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची देखील आहे. त्यामुळे यासाठी त्यांनी स्वत:च्या उत्पन्नातून खर्च करणे अपेक्षित आहे.

---

**राज्यातील आयुर्वेद महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना उपदान व ग्रॅज्युटी वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(१०) ११३६० (०९-०४-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेद महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना उपदान व ग्रॅज्युईटी वेतन योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयुर्वेद महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना उपदान व ग्रॅज्युईटी वेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :** (१), (२) व (३) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे दि. १०.६.२०१३ चा न्याय निर्णय व त्याबाबत दाखल केलेली अवमान याचिकेच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयातील पुनर्विलोकन याचिकेच्या न्याय निर्णयाधीन राहून मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शासन अनुदानीत १) विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती २) श्री.आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर ३) डा. मा. म. आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ ४) श्री.गुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, मोजरी व संलग्नित रुग्णालये या चार याचिकादार संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना केवळ उच्च न्यायालयाचा अवमान होऊ नये म्हणून सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करणेबाबत शासनाने दिनांक १७/१/२०१५ रोजी आदेश निर्गमित कले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयातील पुनर्विलोकन याचिका (Review petition) फेटाळण्यात आलेली आहे.

तथापि, शासन अनुदानीत खाजगी आयुर्वेद व युनानी संस्थांमधील कर्मचारी शासनाचे कर्मचारी नसल्यामुळे व संस्थेचे कर्मचारी असल्यामुळे, या कर्मचाऱ्यांना शासनाचा महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ लागू नसल्याने या कर्मचाऱ्यांच्या वेतना व्यतिरिक्त कोणतीही जबाबदारी शासनाने स्वीकारलेली नाही. त्यामुळे अन्य शासन अनुदानीत खाजगी आयुर्वेद/युनानी संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वरील योजना लागू केलेली नाही.

---

**अंबड (जि.जालना) येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याबाबत**

**(११) ११५५७ (०८-०४-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.जालना) येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याचा निर्णय शासनाने माहे नोव्हेंबर, २०१३ मध्ये घेवूनही अद्याप उक्त ठिकाणी शासकीय अभियांत्रिकी

महाविद्यालयाची उभारणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने उक्त ठिकाणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :**(१) अंबड (जि.जालना) येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचा शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरतील मागाठाणे विधानसभा क्षेत्रात महाविद्यालय उभारण्याबाबत**

**(१२) ११६८४ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मागाठाणे विधानसभा क्षेत्रात एकही उच्च व तंत्र शिक्षण अथवा वैद्यकीय शिक्षण देणारी संस्था अथवा महाविद्यालय उपलब्ध नसल्याने तेथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विभागात शासकीय इंजिनिअरिंग अथवा मेडिकल महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१५) :**(१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद शहरातील (जि.उस्मानाबाद) जिल्हा शासकीय रुग्णालयाला संलग्नित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची केलेली मागणी**

**(१३) ११७८९ (०९-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरातील (जि.उस्मानाबाद) जिल्हा शासकीय रुग्णालयाला संलग्नित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी व तत्पुर्वी वारंवार होत असून याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना विनंती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) प्रस्तावित सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये पुर्णत: कार्यान्वित होत नाहीत तोपर्यंत नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे संयुक्तिक ठरणार नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपुर (जि.सोलापुर) येथील शासनाने मान्यता दिलेले संत तुकाराम विद्यापीठ अद्यापपर्यंत कार्यान्वीत झाले नसल्याबाबत**

**(१४) १३६१४ (०८-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (जि.सोलापुर) येथील राज्य शासनाने सन २००८ मध्ये मान्यता दिलेले संत तुकाराम विद्यापीठ माहे जानेवारी, २०१५ पर्यंत कार्यान्वीत झाले नसल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यापीठ सुरु करण्यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१५) :** (१) संत तुकाराम विद्यापीठास सन २००८ मध्ये शासनाने मान्यता दिलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राणीधानोरा (ता. आर्णी जि.यवतमाळ) येथील शाळेच्या संरक्षक भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(१५) १३७२१ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका आर्णी जि.यवतमाळ येथील राणीधानोरा मध्ये ग्रामपंचायत व प्राथमिक मराठी शाळेच्या संरक्षण भिंत व प्रवेशद्‌वाराचे काम करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संरक्षण भिंतीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी संबंधीत गटविकास अधिकारी यांच्याकडे केला असता सदर कल्पना ग्रामस्थांनी सरपंच व अभियंत्यांना दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संरक्षण भिंतीचे काम पुर्ण झाले असून अद्यापपर्यंत प्रवेशद्‌वार बसविण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०५-०१-२०१६) :** (१) होय.

(२) याबाबत ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे मौखिक तक्रार केली.

(३) हे खरे नाही. प्रवेशद्वार बसविण्याचे काम पुर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील लोककला शास्त्रशुध्द शिक्षण घेण्याबाबत संस्थांना शासनाकडून मदत मिळण्याबाबत**

**(१६) १३९४३ (०९-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोककला शास्त्रशुध्द शिक्षण घेण्याबाबत संस्थांना मदत करण्याकरिता शिक्षण संचालक, पुणे यांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचेकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोककला शास्त्रशुध्द शिक्षण घेण्याकरिता संस्थांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१५) :** (१) प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) या प्रस्तावांतर्गत नवीन पदे निर्माण करणे याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात केवळ ३० विद्यार्थी सैनिकी शाळेतून एनडीएमध्ये दाखल झाल्याबाबत**

**(१७) १४३५१ (०९-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने सन १९९६-९७ पासून सैनिकी शाळा राज्यात सुरु करण्यास परवानगी दिल्याने ३३ मुलांच्या सैनिकी शाळा अनुदानावर सुरु असून गत १६ वर्षात उक्त शाळांवर २०० कोटी रुपये शासनामार्फत अनुदानापोटी खर्च झाले असतानाही आतापर्यंत केवळ ३० विद्यार्थी सैनिकी शाळेतून एनडीएमध्ये दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सैनिकी शाळेतून एनडीए मध्ये दाखल होण्याचे मुलांचे प्रमाण वाढावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एनडीए मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी दाखल होण्याकरीता सैनिकि शाळा अभ्यासक्रमात सुधारणा करणे, त्यासाठी (CBSE) दर्जाचा अभ्यासक्रम तयार करणे, राज्यातील सैनिकी शाळांची तपासणी करणे, तपासणीसाठी समिती नेमण्याचे प्रस्तावित करणे, तपासणी अहवालानुसार शाळाची प्रतवारी करणे असा निर्णय दि.२६.३.२०१५ रोजी मा. मंत्री, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आले. त्यानुषंगाने शिक्षण संचालनालय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेने (आयडॉल) विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज विद्यापीठाकडे सादर न केल्याबाबत**

**(१८) १६७७६ (३०-०७-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेने (आयडॉल) माहे मार्च, २०१५ मध्ये लागलेल्या निकालांच्या पुनर्मूल्यांकनाचे शेकडो विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यापीठाकडे सादर न केल्याने सुमारे ९२० विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित असल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) सर्व विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अर्जाची रेकॉर्डनुसार तपासणी करणे, शुल्क घेणे व त्याचे रेकॉर्ड बनविणे यासाठी वेळ लागला. विद्यार्थ्यांचे सर्व अर्ज परीक्षा विभागात आले त्यानुसार त्या अर्जावर परीक्षा विभागाने कार्यवाही केली आहे. या संदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही व तशी तक्रार विद्यापीठास प्राप्त झालेली नाही.

---

**राज्यातील अनुदानित संस्थामधील शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवेत असताना मृत्यू झाल्यास कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१९) १६९१२ (१०-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान**

**(चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित संस्थामधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवेत असताना मृत्यू झाल्यास कुटूंबियांना शासनाकडून देण्यात येणारी ६० हजाराची मदत वित्त विभागाने आर्थिक तरतूद करुन न दिल्यामुळे गेल्या ५ वर्षामध्ये मिळाली नसल्याची धक्कादायक बाब माहे एप्रिल, २००५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी तात्काळ वित्त विभागाकडून उपलब्ध करुन संबंधिताना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) सन २०१४-१५ मध्ये निधी उपलब्ध करुन दिला असून, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये ७४७ लाभार्थीसाठी रु. ४३,२६५ हजार इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

## मुंबई विद्यापीठात एम.ए.च्या उपयोजित मानसशास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना निकालपत्रात गैरहजर असल्याचे दाखविण्यात आल्याबाबत

**(२०) १७४२० (३०-०७-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात एम.ए.च्या उपयोजित मानसशास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांनी 'वैद्यकीय मानसशास्त्र' या विषयाची परिक्षा दिली असतानाही सर्व २४ विद्यार्थी निकालपत्रात गैरहजर असल्याचे दाखविण्यात आले असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सर्व विद्यार्थ्यांनी परिक्षा नियंत्रकांकडे केलेल्या तक्रारीनुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०१-२०१६) :**(१) होय.

(२) सदर निकालाची C.D. तयार करताना काही तांत्रिक अडचणीमुळे २४ विद्यार्थ्यांना अनुपस्थित दाखविण्यात आले. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचा निकाल गैरहजर दाखविण्यात आला. सदर प्रकरणाची शहानिशा केल्यानंतर दिनांक ०४ एप्रिल, २०१५ रोजी सदर विद्यार्थ्यांचा निकाल घोषित करण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या हद्दीत ४० नवीन विधी महाविद्यालये सुरु करण्याबाबत**

**(२१) १७५६१ (३०-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विधी शाखेकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने मुंबई विद्यापीठाच्या हद्दीत ४० नवीन विधी महाविद्यालये सुरु करण्याबाबत संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूरी देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-११-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ व शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०१० अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार विद्यापीठाने प्रस्ताव सादर केले आहेत. तथापि, शासनाने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी कोणतेही नविन महाविद्यालय, अतिरिक्त तुकड्या, अभ्यासक्रम/विषय व विद्याशाखा मंजूर न करण्याचा निर्णय २९.०४.२०१५ च्या परिपत्रकाद्वारे घेतला आहे. त्यानुसार प्राप्त प्रस्ताव विद्यापीठांना परत पाठविण्यात आलेले आहेत.

---

**पुनर्मूल्यांकनात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची परतावा रक्कम त्यांना देण्याबाबत**

**(२२) १७७१६ (३०-०७-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुनर्मूल्यांकनात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे एटीकेटीच्या परिक्षेकरिता भरलेले पैसे परत करण्याऐवजी त्यांना वारंवार खेपा घालावयास लावून विद्यार्थ्यांचा शारिरीक व मानसिक छळ करण्याचा कारभार मुंबई विद्यापीठाचा परिक्षा विभाग करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचा परतावा रक्कम त्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचवीच्या अभ्यासक्रम यंदा बदलल्याने नव्यानेच बाजारात दाखल झालेल्या पाचवीच्या पाठ्यपुस्तकांच्या किंमती दुप्पटीने वाढल्याबाबत**

**(२३) १७७१७ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचवीच्या अभ्यासक्रम यंदा बदलल्याने नव्यानेच बाजारात दाखल झालेल्या पाचवीच्या पाठ्यपुस्तकांच्या किंमती दुप्पटीने वाढल्या असून सदरील पुस्तक या अगोदर ११३ रुपयांपर्यंत खरेदी करता येत होते. तथापी आता सदरील पुस्तकाच्या खरेदीसाठी २३१ रुपये मोजावे लागतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुस्तकांच्या किंमती कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) व (२) सन २०१५-१६ पासून इ. ५ वी च्या अभ्यासक्रमाची पुर्नरचना करण्यात आली असून पाठयपुस्तकातील पानांचा आकार वाढवून छपाईमध्ये बदल करण्यात आला आहे. पाठयपुस्तकाच्या छपाईसाठी लागणारा कागद,शाई रसायने व वाहतूक यांच्या दरात वाढ झाली आहे. सदर बाबींमुळे पाठयपुस्तकांच्या किंमती वाढल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये घेण्यात येणाऱ्या निवडणुकांबाबत**

**(२४) १८२१५ (३०-०७-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये थेट निवडणुकांमधून स्टुडण्ट कौन्सिल आणि जनरल सेक्रेटरी निवडण्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यातील सर्व विद्यापीठांना दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांमधील निवडणुकांबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) होय.

(२) बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पस मान्यतेच्या विलंबामुळे ६३ एकर जागा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याबाबत**

**(२५) १८२४९ (३१-०७-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पस मान्यतेच्या विलंबामुळे या कॅम्पससाठी हस्तांतरीत केलेली ६३ एकर जागा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) शासनाने दिनांक २४ जून, २०१३ रोजी तत्वतः मान्यता देवूनही सदर कॅम्पसबाबत शासनाने अधिसूचना न काढल्याने कॅम्पसचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) दिनांक २८/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत निकष तयार करण्यात येत असून समितीच्या शिफारशीनुसार सुधारित प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

---

**मुंबई विद्यापीठाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या पीएचडी परिक्षेची हॉल तिकिटे विद्यार्थ्यांना वेळेवर न मिळाल्याबाबत**

**(२६) १८६९३ (३०-०७-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या पीएचडी पात्रताधारक (पदे) परिक्षेची व एम.ए. भाग-१ व एम.ए भाग-२ च्या विद्यार्थ्यांना हॉल तिकिटे वेळेवर मिळाली

नसल्याने परिक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, असल्यास, त्यानुषंगाने याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) हे अशंतः खरे आहे.

(२) व (३) होय, याबाबतीत चौकशी सुरु आहे.

---

### राज्यातील वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील शासकीय रुग्णालयात काम करणाऱ्या कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत

**(२७) १९२१२ (३१-०७-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील राज्यातील शासकीय रुग्णालयात गेली २५ वर्षे बदली कामगार म्हणून काम करणाऱ्या सुमारे २००० कामगारांना सेवेत कायम करण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ डिसेंबर, १९९६ रोजी आदेश देवूनही त्याची अंमलबजावणी अद्याप विभागाकडून करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त बदली कामगारांना शासकीय सेवेत कायम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) विविध मा. न्यायालयांनी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील राज्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालयातील प्रदीर्घ काम करणाऱ्या बदली/रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणेबाबत आदेश पारीत केलेले आहेत,हे खरे आहे.

(२) व (३) शासन आदेश दि.२३.७.२०१५ अन्वये, ७७४ बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यासाठी कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत असून पात्र कर्मचाऱ्यांची अंतिम यादी तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

---

### पाचोरा तालुक्यासाठी (जि.जळगांव) “युडायस” तर्फे पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचा पुरवठा करण्याबाबत

**(२८) १९७३५ (०६-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा तालुक्यासाठी (जि.जळगांव) “युडायस” तर्फे पहिली ते आठवीपर्यंतच्या

विद्यार्थ्यांसाठी ३ लाख ३१ हजार पुस्तकांची आवश्यकता असतांना या पुस्तकांचा वेळेवर व पुरेसा पुरवठा होत नसल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांना बाहेरून पुस्तके खरेदी करावी लागतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त या शैक्षणिक वर्षाकरिता आवश्यक असणाऱ्या पुस्तकांचा पुरेसा पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबमध्ये सामान्य रुग्णांकडून होत असलेली लूट**

**(२९) २०१९२ (३१-०७-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्नोलॉजी अथवा तत्सम शिक्षण घेतलेली व्यक्ती स्वतंत्ररित्या पॅथॉलॉजी लॅब सुरु करु शकत नाही असे कायद्याचे बंधन असतानाही राज्यातील अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबमध्ये दिवसाला किमान २० रुग्णांची तपासणी करण्यात येत असून सदरहू अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबवाले वर्षासाठी सुमारे ८६४ कोटी रुपये सामान्य रुग्णांकडून कमवित असल्याचे महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजीस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट यांच्या आकडेवारीत माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सदरहू अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबमध्ये एकीकडे रुग्णांची लूट होत असून दुसरीकडे या लॅबमधून मिळणा-या रिपोर्टमुळे आरोग्यदेखील धोक्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अनधिकृत लॅबना परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१९-०१-२०१६) :**(१) विकृतिचिकित्सा प्रयोगशाळांमध्ये अनधिकृत वैद्यक व्यवसायाबाबात महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टीसिंग पॅथोलॉजिस्टस् ॲण्ड माइक्रोबायोलॉजिस्टस् या संघटनेची मार्च, २०१५ मधील अभिवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. परंतु या संदर्भात शासकीय यंत्रणेकडून कोणतेही अधिकृत सर्वेक्षण करण्यात आलेले नसल्याने अधिप्रमाणित माहिती उपलब्ध नाही.

भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, पत्र क्र.एस-११०२५/१५१/२००२-एमएच/पीएमएस, दिनांक १७.०२.२००६, याद्वारे असे स्पष्ट करण्यात आले आहे की,

डी.एम.एल.टी. ही अर्हता धारण करणारे व्यक्ति स्वतंत्रपणे विकृतिचिकित्सा प्रयोगशाळा चालवू शकत नाही.
(२) नाही, या बाबतीत अधिप्रमाणित माहिती उपलब्ध नसल्याने तसा निष्कर्ष काढता येणार नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**के.ई.एम च्या दिवंगत परिचारीका कु.अरुणा शानबाग यांचा पाठयपुस्तकात समावेश करण्याबाबतचा समाजातील मान्यवरांनी शासनाकडे धरलेला आग्रह**

**(३०) २०४०८ (१०-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बलात्काराच्या दुर्घटनेची मागील ४० वर्षे बळी ठरलेल्या के.ई.एम.च्या दिवंगत परिचारीका कुमारी अरुणा शानबाग यांचा पाठ्यपुस्तकात समावेश करण्याकरीता समाजातील मान्यवरांनी शासनाकडे आग्रह केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१२-२०१५) :**(१) असा कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात ९ शाळा अनधिकृत असल्याची घोषणा**

**(३१) २०७३० (१०-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात ९ शाळा अनधिकृत असल्याची घोषणा आयुक्तांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनधिकृत शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच या अनधिकृत शाळेच्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०१-२०१६) :**(१) होय.
(२) संबंधित संस्था चालकांना दिनांक १२ मे, २०१५ रोजी अनधिकृत शाळा बंद करुन शाळेमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांना/बालकांना मान्यता प्राप्त शाळेत प्रवेश करुन देणेबाबत नोटीस देण्यात आलेले आहे. तसेच पालकांनी अनधिकृत शाळेत प्रवेश घेण्यात येऊ नये याकरिता माहे मे, २०१५ मध्ये विविध दैनिक वृत्तपत्रांमध्ये तसेच साप्ताहिकांमध्ये जाहिर

सूचना प्रसिद्धी देण्यात आलेली आहे.
(३) शाळा बंद करण्याबाबत संबंधित शाळेला नोटीस देण्यात आल्या आहेत. संबंधित शाळा/संस्था चालकांविरुद्ध भिवंडी महानगरपालिकेमार्फत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर.टी.ई. अंमलबजावणीत राज्याची घसरण झाल्याबाबत**

**(३२) २१०७२ (०६-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीत अखिल भारतीय स्तरावर महाराष्ट्र राज्य हे १९ व्या क्रमांकावर असल्याचे सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विश्व विद्यालय (न्यूपा), नवी दिल्ली यांनी प्रकाशित केलेला एलमेन्ट्री एज्युकेशन इन इंडिया : प्रोग्रेस टू वर्डस यु.ई.ई. चा अहवाल व असर अहवाल या दोन अहवालांमध्ये दर्शविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१६) :** (१), (२), (३) व (४) सन २०१३-१४ च्या राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विश्व विद्यालय (न्युपा), नवी दिल्ली यांनी प्रकाशित केलेल्या एलमेंट्री एज्युकेशन इन इंडिया: प्रोग्रेस टू वर्डस् यु.ई.ई. च्या अहवालामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक विकास निर्देशांकामध्ये १३ व्या क्रमांकावर दर्शविलेले आहे. सन २०१४-१५ च्या अहवालामध्ये क्रमवारी निश्चित केलेली नाही.

---

**नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पुनर्मुल्यांकनाचे निकाल विहीत मुदतीत लागत नसल्याबाबत**

**(३३) २१२८० (३०-०७-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पुर्नमुल्यांकनाचे निकाल परिक्षा झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत लागत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षेचा निकाल हा पुढील सत्राच्या १ दिवस आधी लागत असतांना तसेच सदर परिक्षेचा निकाल हा वेळेत लावण्याचे अनिवार्य असताना संबंधित शिक्षण प्रशासकाकडून याप्रकरणी दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त निकाल वेळेवर लागण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली तसेच निकाल वेळेवर न लावणा-या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :**(१) नाही.
(२) व (३) विद्यार्थ्यांची पुढील सत्राची परीक्षा सुरु होण्यापूर्वी पुनर्मुल्यांकनाचा निकाल लावण्यासंबंधी विद्यापीठ स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. पुनर्मुल्यांकनाचे निकाल लवकरात लवकर लावण्याकरिता विद्यापीठाने पावले उचलली असून Onscreen Revaluation ही पध्दत नव्याने अवलंबविली आहे. या पध्दतीनुसार सद्यस्थितीला प्रायोगिक तत्वावर अभियांत्रिकी व तांत्रिक विद्याशाखेच्या परीक्षांचे पुनर्मुल्यांकनाचे निकाल घोषित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

**सिंदखेड राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) २४ शाळांमध्ये मानव विकास मिशन अंतर्गत अभ्यासिका कार्यान्वित होवूनही अद्यापपर्यंत अभ्यासिका सुरु झाली नसल्याबाबत**

**(३४) २२३३० (१०-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेड राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) २४ शाळांमध्ये मानव विकास मिशन अंतर्गत अभ्यासिका कार्यान्वित होवूनही अद्यापपर्यंत अभ्यासिका सुरु झाली नसल्याचे दिनांक २८ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास पंचायत समितीच्या वार्षिक आमसभेत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभ्यासिका सुरु न होण्याची कारणे काय आहेत,
(३) सदर अभ्यासिका उक्त शाळांमध्ये त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) सदर अभ्यासिका सन २०११-१२ पासून सुरु आहेत.
(३) सदर अभ्यासिका उक्त शाळांमध्ये सुरु असून संबंधित तालुक्याचे गट शिक्षण अधिकारी यांचेकडून वांरवार तपासणी व भेटी देण्यात येतात.

---

**राज्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दृष्ट्या आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या किंमतीत १० टक्क्यांनी करण्यात आलेली वाढ**

**(३५) २२७५५ (०६-०८-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी),**

**श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दृष्ट्या आवश्यक असणा-या स्कुलबॅग, कंपासपेटी, पाऊच, पेन, पेन्सील, खोडरबर, वह्या, स्टिकर, बुककव्हर या वस्तूंच्या किंमतीत मागील वर्षाच्या तुलनेत सन २०१५ मध्ये १० टक्के वाढ करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरातील विद्यार्थ्यांची शालेय वस्तूसाठी लूट होवू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१), (२), (३), व (४) सदर साहित्याची निर्मिती शासनामार्फत करण्यात येत नसून खाजगी उद्योजकांमार्फत केली जाते. उत्पादनाच्या खर्चानुसार साहित्यांच्या किंमती खाजगी उद्योजकांमार्फत निश्चित करण्यात येतात.

---

**पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक) ही पदे भरण्यात आली असून इतर संवर्गातील पदे भरण्याबाबत**

**(३६) २२७७८ (०६-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याच्या (जि.पालघर) निर्मितीनंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक) ही पदे भरण्यात आली असून इतर संवर्गातील पदे भरण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१६) :** (१) व (२) नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) ही तीन पदे भरण्यात आली असून पालघर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणाधिकारी निरंतर शिक्षण, लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक (प्राथमिक व माध्यमिक) तसेच प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या कार्यालयासाठी गट अ ते गट ड संवर्गातील पद निर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

---

**ठाणे-रायगड जिल्हयात मुंबई विद्यापीठाने एम.ए.पार्ट दोनच्या परिक्षेचे चुकीचे पेपर दिल्याने विद्यार्थ्यांना सहन करावा लागणारा त्रास**

**(३७) २२९११ (३१-०७-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-रायगड जिल्हयात मुंबई विद्यापीठाने एम.ए.पार्ट दोनच्या परिक्षेचे चुकीचे पेपर

दिल्याने विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागातून वारंवार होणाऱ्या परिक्षांच्या गोंधळाचा विद्यार्थ्यांवर परिणाम होत असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) होय.

(२) परिक्षाकेंद्रावर चुकीची प्रश्नपत्रिका वितरित केल्याने सदर बाबतीत दि.०३/०७/२०१५ रोजीच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार दोषींना यापुढे परीक्षेच्या कामात कसूर किंवा हलगर्जीपणा केल्यास कडक कारवाई करण्यात येईल अशी सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे प्रादेशिक कार्यालय निर्माण करण्याची केलेली मागणी

**(३८) २३१७२ (३०-०७-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे प्रादेशिक कार्यालय निर्माण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाची नविन विभागीय कार्यालये स्थापन करण्याचे शासनाचे विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणारी पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी देण्याबाबत

**(३९) २३२२३ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके मिळवण्याचा हक्क प्राप्त झाला असतानाही शासकीय अधिकाऱ्यांची अनास्था तसेच पुस्तके खरेदी करण्याच्या प्रक्रियेतील गोंधळामुळे गेल्या १० वर्षांत एकदाही पाठ्यपुस्तके

शाळेच्या पहिल्या दिवशी मिळू शकलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यंदाच्या शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तके पहिल्या दिवशी देण्याबाबतची शासनाची भूमिका काय आहे व त्यासाठी शासनाने पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) पाठयपुस्तकांची वाहतूक करण्यासाठी संचालक (प्राथ) यांच्यास्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबवून वाहतूकदार नियुक्त करण्यात आला आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पाठयपुस्तक मिळतील याद्दष्टीने कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात परिक्षेच्या प्रवेशपत्रात झालेल्या चुका**

**(४०) २४१५१ (३१-०७-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात उन्हाळी सत्र परिक्षेमध्ये मराठी विषय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर इंग्लिश तर इतिहासाच्या जागी गणित, भूगोल हे विषय प्रकाशित झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) परीक्षा आवेदनपत्र भरताना सॉफ्टवेअरद्वारे वापर करीत असताना संलग्नित महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून चुका झाल्या, त्याबाबत योग्य ती दुरुस्ती करुन कोणाताही परीक्षार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची संपूर्ण काळजी परीक्षा विभागाने घेतलेली आहे. त्यामुळे या तांत्रिक चुकांमुळे कोणावरही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १०७०० प्राथमिक शिक्षकांचे वेतन अद्याप मिळाले नसल्याबाबत**

**(४१) २४६२९ (०६-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १०७०० प्राथमिक शिक्षकांचे माहे एप्रिल महिन्याचे वेतन अद्याप मिळाले नाही व मागील ३ महिन्यापासून वेतन वेळेवर मिळत नसल्याचे

निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच शिक्षकांच्या सहाव्या वेतन आयोगाचा पाचवा हप्ताही शिक्षकांच्या खात्यावर जमा करण्यात आला नाही अशी शिक्षकांची तक्रार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांचे वेतन व इतर देयके वेळेवर मिळण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) एप्रिल २०१४ पासून शालार्थ प्रणालीद्वारे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. सदरची पध्दत नव्यानेच सुरु करण्यात आल्यामुळे देयके सादर करताना तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे विलंब झालेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा अंतर्गत व जिल्हयाबाहेर आंतरजिल्हा बदलीने बदल्या झालेल्या आहेत अशा शिक्षकांच्या रकमा विहीत वेळेत जमा करता आलेल्या नाहीत. सद्यस्थितीत संबंधीत शिक्षक हे ज्या आस्थापनेवर कार्यरत आहेत त्या आस्थापनेकडून माहिती उपलब्ध करुन संबंधितांच्या खात्यावर ६ व्या वेतन आयोगाचा पाचवा हप्ता जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) शिक्षकांचे वेतन व इतर देयके वेळेवर मिळण्याची शालार्थ प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर श्री गणेश विद्यालय, बी.बी. दारफळ येथील मुख्याध्यापकांच्या चौकशीबाबत**

**(४२) २४९४६ (०६-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर श्री गणेश विद्यालय, बी.बी. दारफळ येथील मुख्याध्यापकांच्या चौकशीबाबत तसेच मुख्याध्यापक पदाच्या मान्यतेबाबत मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सोलापूर यांना संस्थेच्या सचिवाकडून ५ वेळेस लेखी विनंती करुनही अर्जाबाबत कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, बी.बी.दारफळ, सोलापूर संस्थेच्या कार्यकारणीकडून प्राप्त तक्रारीनंतर मुख्याध्यापक पदास दिलेली मान्यता रद्द करण्यात आली. संस्थेच्या अधिकृत कार्यकारणी मंडळाकडून मुख्याध्यापक पदाचा प्रस्ताव फेरसादर झालेला नाही. संस्थेच्या संमतीने शाळेतील सेवाजेष्ठ शिक्षकाच्या सहीने वेतन व शाळेचे कामकाज चालू

राहण्यासाठी स्वाक्षरीचे अधिकार देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या जास्त असल्याने पटसंख्यानुसार वर्ग खोल्या वाढविण्याबाबत**

**(४३) २५७९६ (१०-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यात माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या जास्त असल्याने शाळांना वर्गखोल्यांची कमतरता असून विद्यार्थी पटसंख्यावर आधारित वर्गखोल्या वाढविणे आवश्यक असल्याचे दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळेस वर्ग खोल्या पटसंख्यानुसार वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१६) :** (१) होय.
(२) शासन निर्णय, दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ अन्वये दिलेल्या निदशानुसार, विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यास शिक्षकाचे पद मंजूर करताना, वर्गखोली उपलब्ध असणे आवश्यक आहे. या माध्यमिक शाळा खाजगी व्यवस्थापनाच्या असून सदर माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्या बांधण्याची कार्यवाही खाजगी शाळा व्यवस्थापनाने करावयाची आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्नड तालुक्यात (जि.औरंगाबाद) शाळांना पुरवठा करण्यासाठी ८९ अग्निशमन यंत्रे वाटपाअभावी गोदामात पडून असल्याबाबत**

**(४४) २५८२० (०६-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड तालुक्यात (जि.औरंगाबाद) शाळांना पुरवठा करण्यासाठी ८९ अग्निशमन यंत्र पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयात प्राप्त झाले असून तालुक्यातील २० केंद्राना त्याचे वाटप करताना कोणत्या केंद्राला किती यंत्रे दिली याचा रजिस्टरमध्ये उल्लेख नसल्यामुळे अशा कोऱ्या रजिस्टरवर साहित्य ताब्यात मिळाल्याबाबतच्या १६ केंद्र प्रमुखांच्या सह्या असून वास्तविक पहाता पंचायत समितीच्या गोदामात ३२ यंत्रे पडून असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही. दिनांक ७/३/२०१५ रोजी कन्नड पंचायत समिती, जि.औरंगाबाद यांना ८९ अग्निशमन यंत्रांचा पुरवठा करण्यात आला. केंद्र प्रमुखांमार्फत संबंधित शाळांना दिनांक १/४/२०१५ पर्यंत अग्निशमन यंत्राचे वाटप करण्यात आले.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या प्रस्तावाबाबत**

**(४५) २६४१९ (३१-०७-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता बृहत आराखड्याद्वारे नविन महाविद्यालय मंजूरीचे प्रस्ताव मागविण्याकरीता दिलेल्या जाहिरातीनुसार हिंगोली जिल्हयातील बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या एकूण किती व कोणत्या संस्थांनी प्रस्ताव सादर केले आहेत,
(२) असल्यास, मा.न्यायालयाने गुणवत्तेनुसार प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देश देवूनही विद्यापीठाने शिफारस केलेल्या व बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या संस्थांचे प्रस्ताव डावलून बृहत आराखड्याबाहेरील संस्थांचे नियमबाह्य प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) एकूण ०६ संस्थानी प्रस्ताव सादर केले आहेत.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या एमबीएच्या परिक्षेत सुमारे ४० टक्के प्रश्न जुन्या अभ्यासक्रमावर आधारित असल्याने विद्यार्थ्यांनी परिक्षेवर बहिष्कार टाकल्याबाबत**

**(४६) २७१८३ (३०-०७-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिक्षा केंद्र असलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या एमबीए च्या विद्यार्थ्यांना परिक्षेतील सुमारे ४० टक्के प्रश्न जुन्या अभ्यासक्रमावर आधारित असल्याने विद्यार्थ्यांनी परिक्षेवर बहिष्कार टाकला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुंबईसह पुणे, नाशिक, सोलापूर येथील लॅबमध्ये प्रशिक्षित नसलेले दंत कारागीर (डेंटल मेकॅनिक) काम करीत असल्याबाबत**

**(४७) २८२५६ (१०-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबईसह पुणे, नाशिक, सोलापूर येथील लॅबमध्ये प्रशिक्षित नसलेले दंत कारागीर (डेंटल मेकॅनिक) काम करीत असल्याचे दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा बोगस दंत कारागीरावर कारवाई करणेबाबत महाराष्ट्र डेंटल कौन्सिल यांनी राज्याच्या आरोग्य विभागाकडे तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०१-२०१६) :** (१) या संदर्भात शासकीय यंत्रणेकडून कोणतेही अधिकृत सर्वेक्षण करण्यात आलेले नसल्याने अधिप्रमाणित माहिती उपलब्ध नाही. परंतु याच विषयावर दिनांक ०३.०९.२०१५ रोजी एक अभिवेदन महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई, यांच्या कार्यालयास प्राप्त झाले.
(२), (३) व (४) नाही. परंतु महाराष्ट्र राज्य दंत परिषदेकडून याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यात १० वी व १२ वी परिक्षेच्या अंतिम परिक्षेच्यावेळी लावण्यात आलेल्या जनरेटरचे भाडे देण्यात न आल्याबाबत**

**(४८) २८२९० (१७-११-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे मार्च-एप्रिल, २०१५ च्या सुमारास दहावी व बारावीच्या अंतिम परिक्षेच्या वेळी शासनाने दिलेल्या आदेशान्वये लावण्यात आलेल्या जनरेटरचे भाडे शाळांना विद्युत पुरवठ्याच्या बाबतीत शासनाकडून देण्यात येणाऱ्या वेतनेत्तर अनुदानातून वीजेचा आकार खर्च करण्याची तरतूद असतानाही जनरेटरच्या मालकांना अद्याप भाडे मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात एकूण किती जनरेटर लावण्यात आले असून त्याचे भाडे किती निश्चित करण्यात आले होते.

(३) सदरचे देयक अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यात एकूण ११८ केंद्रांवर जनरेटर/इन्व्हर्टर भाड्याने लावण्यात आले होते. त्यांचा खर्च अदा करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**सर्व शिक्षा अभियानाचे १२८० कोटी ९९ लाख रुपये**
**अखर्चित असल्याबाबत**

**(४९) २८३०६ (१७-११-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ४ कोटी विद्यार्थी शिकत असून, ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी राबविलेल्या सर्व शिक्षा अभियानाचे १२८० कोटी ९९ लाख रुपये विभागाने न वापरल्याने अखर्चित राहिले असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सर्व शिक्षा अभियानाचे वित्तीय व्यवस्थापन मुंबईतील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेच्या माध्यमातून केले जात असून, त्यासाठी ६५ टक्के निधी केंद्र शासन व ३५ टक्के निधी राज्य शासन देते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधीतून राज्यातील शासकीय, अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविणे, इत्यादी उद्दिष्टये असताना, त्यासाठी हजारो कोटीचा निधी उपलब्ध असताना बहुतांश शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यास महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद अपयशी ठरली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) वित्तीय वर्ष सन २०१४-१५ करिता केंद्र शासनाच्या मंजूरी तरतुदीनुसार केंद्र हिस्सा ६५ टक्के व राज्य हिस्सा ३५ टक्के होता.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मॅनेजमेंट, इंजिनिअरिंग आणि फार्मसी महाविद्यालयाच्या मान्यता काढून घेण्याची पाठविलेली नोटीस**

**(५०) २८३०७ (१७-११-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मॅनेजमेंट, इंजिनीअरिंग आणि फार्मसी महाविद्यालयात शासनाच्या विषयाची होत असलेली पायमल्ली, असणा-या त्रुटीची पुर्तता न करणे इत्यादी कारणास्तव २९ महाविद्यालयांना इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशनने लेटर ऑफ रिजेक्शनची नोटीस माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्यानुसार विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सदर बाब विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी शासनाने प्रसारित केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून ८ पदवी, २ पदव्युत्तर पदवी आणि २ पदविका संस्थांना मुदत वाढ देण्यात आली नाही. तसेच ३ महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेत घट करुन मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) तंत्र शिक्षण संचालनालयाच्या आखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता, प्रवेश क्षमतेत वाढ व मुदतवाढ देण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद या केंद्र शासनाच्या शिखर संस्थेला आहेत. याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने तपासणी अंती सदर संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी मुदतवाढ न दिल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या होत्या. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता ८ पदवी, २ पदव्युत्तर पदवी आणि २ पदविका संस्थांना प्रवेश प्रक्रीयेमध्ये समाविष्ठ करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.